अखंड महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड **लोकनेता**

Lokneta News - लोकनेता न्युज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंडे ●

प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे
Epaper: www.dainiklokneta.in/
दैनिक लोकनेता
दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.
मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112
dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

रविवार दि.२६ एप्रिल २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २५२ किंमत २ रुपये 7499615933

## प्रभारी होताच डॉ.प्रितमताई मुंडे यांनी घेतली भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक

# कार्यकर्त्यांसोबत ‘अल्पोपहार ते चाय पे चर्चा’

# प्रितमताईंच्या कार्यपद्धतीने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

## संघटन वाढवण्यासाठी ताकदीने काम करण्याचा दिली विश्वास

लोकनेता न्यूज नेटवर्क

**छ.संभाजीनगर । डॉ.ज्ञानदेव चेपटे**

छ.संभाजीनगर–दि.२५–संभाजीनगर पश्चिम जिल्ह्याच्या भाजपच्या प्रभारी माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांची प्रभारीपदी नियुक्ती होताच त्यांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे. पश्चिम जिल्ह्यातील भाजपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची त्यांनी अनौपचारीक बैठक घेतली आणि सर्वांशी संवाद साधला. पक्षासाठी तळमळीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना सन्मान मिळवून देण्यासह संघटन बळकट करण्यासाठी आपण ताकदीने काम करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

शहरातील जानकी हॉटेल येथे संभाजीनगर पश्चिम जिल्ह्यातील कन्नड विधानसभा, गंगापूर विधानसभा, वैजापूर विधानसभा आणि संभाजीनगर पश्चिमच्या



ग्रामीण भागातील पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष यांची डॉ. प्रितमताई मुंडे यांनी अनौपचारीक बैठक घेतली. यावेळी त्यांनी सर्वांसोबत अल्पोपहार घेऊन चाय पे चर्चा केली. तसेच त्यांनी सर्वांचा परिचय करत संवाद साधला आणि आगामी निवडणुका, पक्ष संघटन आणि आगामी काळातील पक्षाचे उपक्रम यासंदर्भात विचारमंथन केले.

यावेळी उपस्थितांची मुक्तचर्चा करताना डॉ. प्रितमताई मुंडे म्हणाल्या की भाजपचे कार्यकर्ते तळमळीने आणि निःस्वार्थपणे काम करतात. काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला सन्मान मिळवून देण्यासाठी आपण काम करणार आहोत. आज सर्वांशी भेटून मला आनंद होतो आहे. पक्षाने दिलेली जवाबदारी प्रामाणिकपणे आणि पूर्ण ताकदीने पार पाडणार आहे. प्रदेश भाजप आणि स्थानिक पदाधिकारी कार्यकर्त्यांमध्ये समन्वय ठेवण्यासाठी देखील आपण काम करणार असल्याचा विश्वास त्यांनी याप्रसंगी कार्यकर्त्यांना दिला. बैठकीस जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

### लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्याप्रमाणेच प्रितमताईंची कार्यपद्धती : संजय खंबायते

प्रभारी पदाची जवाबदारी मिळताच डॉ. प्रितमताई मुंडे यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा परिचय व्हावा म्हणून बैठक घेतली. केवळ बैठक आयोजित न करता त्यांनी सर्वांसोबत बसून अल्पोपहार घेतला. सर्वांना वेळ देऊन सर्वांशी आपुलकीने संवाद साधला.कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवणारी ही कृती होती.मुंडे साहेबांना कार्यकर्ते हवेहवेसे असायचे, प्रितमताईंची कार्यपद्धती देखील मुंडे साहेबांसारखीच असल्याने पुढील काळात पक्ष कार्य जोमाने होणार असल्याचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यावेळी म्हणाले.

# दिग्रस मध्ये ओबीसी संघटना आक्रमक

# विविध मागण्यांसाठी निवेदन सादर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किशोरकी. कांबळे । दिग्रस**

विविध प्रलंबित मागण्यांसाठी ओबीसी संघटना दिग्रसच्या वतीने गुरुवार दि. २३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसीलदारामार्फत राष्ट्रपती, राज्यपाल, मुख्यमंत्री, ओबीसी आयोग तसेच जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले. या वेळी ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.निवेदनात ओबीसी, एससी, एसटी समाजावर होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात ठोस भूमिका मांडण्यात आली असून, जातनिहाय जनगणना, कडक UGC इक्विटी रेग्युलेशन लागू करणे, शेतकऱ्यांना हमीभाव देणे, शिक्षकांना TET मधून सूट देणे आणि विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती सुरू करण्यासह विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

संघटनेने नमूद केले की, केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेबाबत भूमिका घेतली



असताना प्रत्यक्ष जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम देण्यात आलेला नाही, ही गंभीर बाब असून ओबीसी समाजाशी अन्याय आहे. ओबीसी समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व व विकासासाठी स्वतंत्र जातवार जनगणना अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, ओबीसी, एससी, एसटी समाजाच्या हितासाठी कडक णत्रछ इक्विटी कायदा लागू करण्याची मागणी करत, सध्याच्या धोरणांवर नाराजी व्यक्त करण्यात आली. राज्यात वाढत्या शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर शेतीला उद्योगाचा दर्जा देऊन शेतमालाला किमान आधारभूत किंमत (MSP) लागू करण्याचीही मागणी करण्यात आली.

याशिवाय, २०११ पूर्वी नियुक्त शिक्षकांना RTE अंतर्गत TET परीक्षेतून सूट देण्याची तसेच ओबीसी, एससी, एसटी विद्यार्थ्यांची थांबलेली शिष्यवृत्ती तात्काळ सुरू करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.वरील सर्व मागण्या तातडीने पूर्ण न झाल्यास ओबीसी, एससी, एसटी समाजाच्या वतीने मोठ्या प्रमाणात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.निवेदन देताना सागर महिंद्रे, विजय घाटे, गजानन आंबेकर, चोपडे सर, पुंडलिक उबाळे सर, संदीप रत्नपारखी, दिलीप जवादे सर, मनोहर काटकर, आनंद राऊत, भारत पाटील महिंद्रे, एकनाथ चिंचाने सर, ओंकार ठाकरे पाटील, कैलास नवघरे, मोरेश्वर उईके सर, दिलीप शिंगाने सर, डॉ. गणेश महाजन, खाडे जी, अविनाश लखपती सर, सुरेश आरेकर, दीपक माहुरकर, ॲड. नरेश इंगोले, लक्ष्मण वासकर सर, साहेबराव हटवार सर, डॉ. सदानंद निरपासे, विकास गावंडे, विनोद वानखेडे सर, दुर्गेश निभवे, टिळक नाईक, दिलीप डहाके, सुनील हिरास आदी ओबीसी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुराव्याअभावी बलात्कार प्रकरणातील आरोपी निर्दोष मुक्त; न्यायालयाचा निकाल

लोकनेता न्यूज नेटवर्क

**संजय यलमवाड । मुखेड**

तालुक्यातील मौजे जिरगा येथील बलात्कार प्रकरणात न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत आरोपी रमेश ईश्वर जाधव आणि राजू गोविंद बोयनर यांना सढळ व ठोस पुराव्या अभावी निर्दोष मुक्त केल्याचा निकाल न्यायालयाने दिला आहे. आरोपींच्या बाजूने ड.नामदेव हाके यांनी प्रभावी युक्तिवाद मांडला ज्यांच्या आधारे न्यायालयाने दोन्ही आरोपींना निर्दोष मुक्त केले आहे.

सदर बलात्कार प्रकरणात फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २३५ (१) अन्वये निर्णय देताना न्यायालयाने भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम ३७६ (डी), ३७६ (२) (एन), ५०६ तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा कलम ३ (२) (५) आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७,६७–अ अंतर्गत लावण्यात आलेले आरोप सिद्ध न झाल्याचे नमूद केले.या प्रकरणात फिर्यादी पक्षाकडून एकूण नऊ साक्षीदारांची तपासणी करण्यात आली होती.मात्र साक्षी आणि पुरावे न्यायालयाच्या कसोटीवर टिकले नाहीत.आरोपींच्या बाजूने ड.एन.पी.हाके यांनी प्रभावी युक्तिवाद मांडला, ज्यांच्या आधारे न्यायालयाने दोन्ही आरोपींना निर्दोष मुक्त केल्याचा निकाल दिला आहे.दरम्यान दि.१२



नोव्हेंबर २०१५ रोजी दुपारच्या सुमारास जिरगा येथे ही घटना घडल्याचा आरोप होता.फिर्यादी महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार,ती शौचास गेली असताना आरोपी रमेश जाधव याने तिच्यावर जबरदस्ती केली तसेच त्याच्या साथीदाराने कथितपणे घटनेचे चित्रीकरण केल्याचा आरोप होता.यानंतर धमकी देण्यात आल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले होते.तसेच जबरदस्तीचे शारीरिक संबंध, त्याचे व्हिडिओ चित्रीकरण आणि त्यानंतर गर्भधारणा व गर्भपात घडवून आणल्याचे गंभीर आरोपही फिर्यादीने केले होते.मात्र न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान या सर्व आरोपांना पुष्टी देणारे ठोस पुरावे समोर आले नाहीत त्यामुळे शंका लाभाचा फायदा देत न्यायालयाने आरोपींची निर्दोष सुटका केली.या निर्णयामुळे परिसरात विविध प्रतिक्रिया उमटत असून, प्रकरणाच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

## मराठा साम्राज्याचे सातवे सरसेनापती संताजी घोरपडे यांचा शौर्य दिन साजरा



लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

येथील शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठा साम्राज्याचे सातवे सरसेनापती

संताजी घोरपडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शौर्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मराठा साम्राज्यातील पराक्रमी सेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्या स्मरणार्थ हा दिन आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयातील बी.एससी. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी केतन गोरख राठोड याची मुंबई लोहमार्ग पोलिस दलात निवड झाल्याबद्दल त्याचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून इतिहास विभाग प्रमुख डॉ. भगवान जायभाय उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे होते.

डॉ. जायभाय यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात संताजी घोरपडे यांच्या पराक्रमाचा गौरव करताना सांगितले की, मराठा साम्राज्यातील ते अत्यंत धाडसी व पराक्रमी सरसेनापती होते. राजाराम महाराजांच्या काळात त्यांनी धनाजी जाधव यांच्या सहकार्याने मुघल सत्तेविरुद्ध तब्बल सतरा वर्षे संघर्ष करत स्वराज्याचे संरक्षण केले. त्यांच्या युद्धकौशल्यामुळे मराठा साम्राज्य टिकून राहिले, असे त्यांनी नमूद केले.अध्यक्षीय समारोपात डॉ. कोठावळे यांनी संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्या युद्धनीतीचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले की, २५ एप्रिल १६९० या दिवशी सातारा किल्ल्याच्या पायथ्याशी मोगल सरदार सर्ज्या खानच्या अफाट सैन्यासोबत लढताना बुद्धीचातुर्य , प्रचंड धाडस आणि साहस, वेगवान हालचाली आणि गनिमी काव्याच्या प्रभावी वापरामुळे त्यांनी सर्ज्या खानचा पराभव करून जिवंत पकडले. औरंगजेबाच्या प्रबळ सैन्यालाही जेरीस आणले आणि हिंदवी स्वराज्याच्या रक्षणात मोलाची भूमिका बजावली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ह. सो. बिडवे यांनी केले तर आभार डॉ. संदीप सातोणकर यांनी मानले यावेळी उपप्राचार्य डॉ.शिवाजी यादव डॉ.सुरेश नलावडे डॉ. सुभाष पोटभरे डॉ.हेमंत कुमार जैन डॉ. गांधी बानायत डॉ. उत्तम जाधव प्रा.विनोद कांबळे प्रा.सचिन कदम गजानन इंगळे प्राध्यापक, कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## चिचपल्लीचा बांबू मिशन देशभर गाजणार!–आमदार सुधीर मुनगंटीवारांचा आक्रमक इशारा,केंद्राला देणार राष्ट्रीय दर्जा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर । सिद्धेश्वर केंद्रे**

चिचपल्ली येथील बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राला केवळ स्थानिक पातळीवर मर्यादित न ठेवता ते देशातील आदर्श संशोधन, प्रशिक्षण आणि रोजगारनिर्मितीचे ‘मॉडेल हब’ बनवण्याचा निर्धार आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. केंद्राच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी आक्रमक भूमिका घेत स्पष्ट संदेश दिला की, बांबू अर्थव्यवस्थेला आता नवी गती देणारच!

आ. मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत केंद्राला संशोधन, कौशल्यविकास आणि रोजगारनिर्मितीचा मजबूत आधार बनवण्यावर भर देण्यात आला. दोन वर्षांच्या खंडानंतर केंद्राची गती मंदावली असली तरी आता नव्या उर्जेने काम सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

यावेळी बांबूपासून फर्निचर, वस्त्रोद्योग, तंतू, खाद्यपदार्थ, इंधन गोळे, पर्यावरणपूरक उत्पादने यांसारख्या विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर संशोधन व उत्पादन वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये बांबू फर्निचरचा वापर सक्तीने वाढवण्यासाठी शासन निर्णय काढण्याची तयारीही त्यांनी दर्शवली.

बैठकीत ‘वनश्री बांबू दालन’ या स्मरणिका दुकानाचे उद्घाटन तसेच मुलींच्या वस्तीगृहाचे लोकार्पण करण्यात आले. केंद्राच्या इमारतीचा आशियातील उत्कृष्ट वास्तूंमध्ये



समावेश झाल्याचा अभिमानही व्यक्त करण्यात आला.

चीन व फिलिपिन्ससारख्या देशांमधील प्रगत बांबू उद्योगाचा अभ्यास करण्यासाठी विशेष समिती स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच उडठ निधी, निती आयोग आणि औद्योगिक संस्थांकडून निधी उभारणीसाठी ठोस प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश देण्यात आले.

विद्यार्थ्यांना थेट रोजगार मिळेल अशा अभ्यासक्रमांची आखणी, विद्यापीठांच्या सहकार्याने पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याची शक्यता, तसेच कौशल्य विकास विभागाशी संलग्नता यावरही भर देण्यात आला.

बांबूला ‘हरित अर्थव्यवस्थेचा कणा’ मानत आ. मुनगंटीवार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की,

चिचपल्ली केंद्र हे फक्त प्रकल्प नाही, तर भविष्यातील आर्थिक क्रांतीचे केंद्र आहे!

यावेळी जिल्हाधिकारी, वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी, ताडोबा प्रकल्पाचे अधिकारी तसेच विविध तज्ज्ञ उपस्थित होते.

# सुनेत्रा पवार अन् अक्षय कर्डिलेंचा विजय निश्चित-नवनाथ बन

## उबाठा गटाच्या कार्यालयावर काँग्रेसचा झेंडा; त्यांचे विचार पसरवणे हेच आता ठाकरेंचे काम

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई । प्रतिनिधी**

निवडणूक आयोगावर कोणत्याही पक्षाचा झेंडा नाही, पण उबाठा गटाच्या कार्यालयावर काँग्रेसचा झेंडा दिसून येत आहे. उबाठा काँग्रेसची चाकरी करत आहे, त्यांची गुलामी करत आहे. उबाठा गटाच्या शिल्लक कार्यालयावर काँग्रेस झेंडा आणि तिथून काँग्रेस विचार पसरवण्याचे काम सुरू आहे, हेच उद्धव ठाकरे आणि संजय राऊतांचे धोरण झाले आहे, असे भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी म्हटले आहे.नवनाथ बन म्हणाले की, बारामती आणि राहुरीमध्ये महायुतीचे दोन्ही उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून येतील, जनता महायुतीसोबत आहे. अजित पवार यांच्या अपघातानंतर पोटनिवडणूक घेण्याची वेळ आली आहे. बारामतीकर हे सुनेत्रा पवार यांच्या पाठिशी आहेत. तिथे मविआने जे सहकार्य केले आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. राहुरीमध्ये जनता महायुतीच्या बाजून आहे तिथे अक्षय कर्डिले यांचा विजय निश्चित आहे.नवनाथ बन म्हणाले की, बारामतीमध्ये पवार विरुद्ध पवार सामना व्हावा ही रोहित पवार यांची इच्छा आहे. कारण ते स्वत:ला महाराष्ट्राचे स्वयंघोषित मोठे नेते समजतात. त्यांना वाटते की महाराष्ट्रात शरद पवार यांच्यानंतरचा बडा नेता मीच आहे. म्हणून प्रत्येक मुद्द्यावर ते भाष्य करत असतात. अजित पवार असल्यापासून रोहित पवार बारामती आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. २०२९ मध्येही त्यांची डाळ शिजणार नाही. बारामती अजित पवारांच्या वारसाकडेच असणार हे रोहित पवार यांनी लक्षात ठेवले पाहिजे.नवनाथ बन म्हणाले की, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये इंडिआ आघाडीतील पक्षांचा पराभव होत असल्याने संजय राऊत यांच्या पायाखालची वाहू सरकली आहे. तिथली जनता ममता बॅनर्जी यांच्या दहशत जुगारत मतदानासाठी बाहेर पडत आहे. तिथे भाजपची सत्ता येणार आहे. म्हणून संजय राऊत हे कधी संविधान तर कधी निवडणूक आयोगावर शंका घेणार आहेत. तामिळनाडूमधील जनता स्टॅलिन यांना वैतागली आहे. तर पश्चिम बंगालमधील जनता ममता बॅनर्जी यांना वैतागली आहे. त्यामुळे यंदा तिथे भाजपचीच सत्ता येणार आहे.नवनाथ बन म्हणाले की, भाजप आसाम, पश्चिम बंगाल, तामिळनाडूची चिंता करते पण तुम्ही मात्र काँग्रेसची चिंता करायला लागले आहात. तुम्हाला तुमच्या पक्षाचे काय होईल या पेक्षा काँग्रेसचे आसाममध्ये काय होईल हे महत्त्वाचे वाटायला लागले आहे. तुम्हाला स्टॅलिन, ममता बॅनर्जीची चिंता आहे. उरणमध्ये उबाठा गट नाही त्याची चिंता करा. आदित्य ठाकरे उबाठा गटाचे कार्याध्यक्ष होणार असून त्यांना पद मिळताच राऊतांची पक्षातून हकालपट्टी होणार आहे. त्याबद्दल तुम्ही चिंता करायला हवी.



# खून प्रकरणात आरोपींना सत्र न्यायालयाकडून जामीन मंजूर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

मरखेल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गंभीर खून प्रकरणात अटकेत असलेल्या दोघांना बिलोली येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला असून, खुनाच्या आरोपाखाली न्यायालयीन कोठडीत असलेल्या आरोपी बालाजी मारोती गंदमुळे व हुलूपा ज्ञानोबा गंदमुळे यांना शुक्रवारी (दि. २४) रोजी न्यायालयाने अटींसह जामीन मंजूर केला आहे.

सदर प्रकरणात आरोपींकडून नियमित जामीनासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता. अर्जावरील सुनावणीदरम्यान बचाव पक्षातर्फे ॲड. अंकुशराजे तुळशीराम जाधव यांनी सखोल व कायदेशीर युक्तिवाद सादर केला. त्यांनी गुन्हा नोंदविण्यात झालेला विलंब, तपासातील त्रुटी, तसेच घटनाक्रमातील विसंगती यांकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. तसेच, प्रकरणात आरोपींच्या विरोधात कोणताही ठोस, प्रत्यक्ष किंवा विश्वासार्ह पुरावा उपलब्ध नसल्याचे नमूद करून केवळ संशयाच्या आधारावर आरोपींना गुंतविण्यात आले असल्याचा मुद्दा तसेच बचावात्मक व तपास यंत्रणा व संबधित प्रकरणात असलेल्या त्रुटी न्यायालयासमोर मांडल्या. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद विचारात घेऊन न्यायालयाने आरोपींना प्रत्येकी पन्नास हजारांच्या वैयक्तिक जामिनावर तसेच त्याच रकमेच्या एक सक्षम जामीनदाराच्या अटीवर मुक्त करण्याचा आदेश दिला. यासोबतच, आरोपींनी आवश्यकतेनुसार तपास यंत्रणेस सहकार्य करणे व पुढील सुनावणीस प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, देगलूर यांच्या न्यायालयात नियमित हजर राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रकरणात ॲड. अंकुशराजे तुळशीराम जाधव यांनी मुख्य युक्तिवाद केला असून त्यांना ॲड. सद्दाम शेख दावणगीरकर व ॲड. विठ्ठल जेठे यांनी सहकार्य केल

# कोठारी-हिमायतनगर रस्त्याच्या दर्जाबाबत संताप

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**



रस्ता धड नाही, मग टोल कशासाठी, असा संतप्त सवाल नांदेड भोकर-हिमायतनगर-किनवट या राष्ट्रीय महामार्गावरून प्रवास करणारे वाहनधारक उपस्थित करत आहेत. राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ (ए) वरील कोठारी ते हिमायतनगर या टप्प्यातील कामाचा दर्जा सुमार झाला आहे. परंतु दुधगावजवळ टोल प्लाजाचे काम चालू आहे.तरी आधी महामार्ग दुरुस्त करण्याची मागणी वाहन चालकाकडून होत आहे. कोठारी ते इसलापूर आणि हिमायतनगर दरम्यान झालेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामात अनेक त्रुटी आहेत. अनेक ठिकाणी रस्ता खचला असून तडे गेले आहेत. महामार्गापेक्षा पूर्वीचा डांबरीकरणाचा राज्य मार्गच बरा होता, असे म्हणण्याची वेळ आली आहे.किनवट कोठारी हिमायतनगर भोकर राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण करून नंतरच टोल वसुली करावी अशी मागणी नागरिकाकडून होत आहे.

अगोदर कामाला दर्जा द्यावा आणि रस्ता सुस्थितीत करावा. त्यानंतरच टोल शुल्क वसूल करावी. निकृष्ट रस्त्यासाठी आम्ही पैसे का मोजायचे, असाही प्रश्न वाहनचालक उपस्थित करु लागले आहेत.

# उष्णतेपासून कामगार वर्गाचे संरक्षण करणे ही मालकाची प्राथमिक जबाबदारी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । अनिल पाटील तेलंग**

सध्या वाढत्या तापमानामुळे (Heat Wave परिस्थिती) दुपारी १२ ते सायं. ४ या वेळेत उघड्यावर काम करणाऱ्या कामगारांच्या तसेच कारखान्यातील, दुकानातील, हॉटेल्स मधील, खाद्यागृहे, आय टी कंपन्या, शॉपिंग मॉल्स, किरकोळ विक्रीची दुकाने, एमआयडीसी मधील उद्योगातील कामगार व इतर ठिकाणी काम करण्याऱ्या कामगारांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सर्व आस्थापनांना याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. उष्णेतेपासून कामगार वर्गाचे संरक्षण करणे ही मालकाची प्राथमिक जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने पुढील उपाययोजना तात्काळ राबविणे सर्व आस्थापनांना बंधनकारक आहे.

दुपारी १२ ते ४ यावेळेत कामगारांकडून कष्टाची, शारीरिक श्रमाची कामे करून घेण्यात येऊ नयेत, यास्वरूपाच्या कामाच्या वेळापत्रकात बदल करण्यात यावा किंवा अशी कामे बंद ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी. कामगारांसाठी सावली (Shade), विश्रांती कक्ष उपलब्ध करून देण्यात यावा. कामाच्या ठिकाणी स्वच्छ थंड व मुबलक पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे. कामाच्या ठिकाणी सुरक्षितता संबंधी सूचना तसेच आपत्कालीन नंबर स्पष्टपणे प्रदर्शित करण्यात यावा. स्थानिक आरोग्य व्यवस्थेशी समन्वय ठेऊन उष्माघात सारखी प्रकरणे आढळल्यास तातडीने उपचार करण्याची सोय करावी.या सूचनांचे पालन न केल्यास संबंधित आस्थापनांवर कडक कारवाई करण्यात येईल. असा इशारा सहायक कामगार आयुक्त आशिष दिलीप ढवळे यांनी दिला आहे.

# कोठा जहागीर येथे भीषण पाणी टंचाई टँकर सुरु करण्याची लोकजागर संस्थापक अध्यक्ष केशव पाटील जंजाळ यांची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । ज्ञानेश्वर जगताप**

भोकरदन तालुक्यातील कोठा जहागीर गावात भीषण पाणी टंचाई बाबत गट विकास अधिकारी भोकरदन यांना निवेदन दिले.. लोकजागर अभियान संघटनेच्या वतीने येणारा २७ तारखेच्या आत प्रशासनांना तत्काळ दखल घेऊन कोटा जहागीर येथे टँकर सुरू केले नाही तर हंडा मोर्चा कोठा जहागीर गावातील महिला व पुरुषाच्या माध्यमातून पंचायत समिती गट विकास अधिकारी यांचा कार्यालयावर काढण्यात येणार आहे. असा लोक जागर अभियान संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री केशव पाटील जंजाळ यांनी प्रशासनाला इशारा दिलेला आहे. यावेळी



सोबत माजी सरपंच दादाराव जी आगळे, तसेच फकीर भाऊ उबाळे श्री अशोकराव इंचे गावातील समस्त व गावकऱ्यांच्या वतीने इशारा देण्यात आलेला आहे. गेल्या दोन महिन्यापासून गावाच्या परिसरामध्ये पाणीच नाही ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गेल्या पंधरा मार्च ला प्रस्थाव देऊनही अद्याप पर्यंत प्रशासनाने दाखल घेतली नाही. या पाणी टंचाई ची दखल लोकजागर संघटनेच्या वतीने घेण्यात आलेले असून येणाऱ्या २७ तारखेला मोठा हंडा मोर्चा पंचायत समिती भोकरदन येथे काढण्यात येणार आहे,या मोर्चासाठी मोठ्या संख्येने गावकरी मंडळीनी उपस्थितीत राहावे असे आव्हान लोक जागर संघटनेचे अध्यक्ष श्री केशव पाटील जंजाळ यांनी केले. होत असलेल्या दिरंगाई साठी प्रशासनाला धडा शिकवण्याची गरज आहे असे मत मांडले. गावाच्या परिसरात जंगलात पाणी उपलब्ध नसून लोक खाजगी टँकर पाणी विकत घेत आहे व वृद्ध लोकांचे हाल होत असून सदरील गावाला तात्काळ टँकर आपण लक्ष घालून २६ तारखे च्या आत सुरू करावे. नसता संविधानाच्या आधारे लोकशाही मार्गाने आम्ही आपल्या कार्यालयावर हंडा मोर्चा घेऊन येणार आहोत.यांची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील लोकजागर संघटना संस्थापक अध्यक्ष केशव पाटील जंजाळ यांनी दिली आहे.गट विकास अधिकारी, तहसीलदार भोकरदन,पोलीस निरीक्षक भोकरदन व उपविभागीय अधिकारी भोकरदन यांना निवेदन देण्यात आलेले आहेत.

## ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामामुळे बीडमध्ये सकारात्मक परिवर्तन!

## अंजली व अनिश दमानिया यांचा दोन दिवशीय कृषीकुल दौऱ्यात प्रभावी सुसंवाद

# माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांचीही भेट; शेती - मातीच्या विषयावर सखोल चर्चा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

कधीकाळी तीव्र दुष्काळ, शेतीचे अपयश आणि मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर यासाठी ओळखला जाणारा बीड जिल्हा आज हळूहळू सकारात्मक बदलाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र दिसत आहे. या परिवर्तनामागे ग्लोबल विकास ट्रस्टच्या सातत्यपूर्ण आणि शाश्वत कामाची मोठी भूमिका असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केले. २०१२ साली बीड जिल्ह्यात प्रथम दौरा केल्याच्या आठवणी सांगताना त्या म्हणाल्या, त्या वेळी अनेक गावांमध्ये अत्यंत विदारक परिस्थिती होती. पाण्याचा तीव्र दुष्काळ, शेती संकटात आणि गावात केवळ लहान मुले व वृद्धच दिसत असत. मात्र गेल्या काही वर्षांत झालेल्या कामांमुळे आज या परिस्थितीत लक्षणीय बदल झालेला दिसतो.त्या पुढे म्हणाल्या की, २०१६ पासून माझे बंधू मयंक गांधी आणि संजय परमार यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी केलेल्या कामामुळे हा बदल शक्य झाला आहे. फळबाग लागवडीसाठी प्रोत्साहन, आधुनिक तांत्रिक मार्गदर्शन आणि थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दिलेला आधार यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. परिणामी, शेतीकडे पुन्हा ओढ निर्माण झाली असून जिल्ह्यातील स्थलांतरालाही आळा बसला आहे. जलसंधारणाच्या प्रभावी कामांमुळे शेतीला पाणी उपलब्ध होणे ही या बदलाची सर्वात महत्त्वाची बाजू असल्याचे त्यांनी नमूद केले.सिरसाळा येथील ग्लोबल विकास ट्रस्टच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कृषीकुल प्रशिक्षण केंद्राला दिलेल्या दोन दिवसीय भेटीत अंजली दमानिया आणि त्यांचे पती अनिश दमानिया यांनी विविध उपक्रमांची सखोल पाहणी केली. डेमो प्लॉट्स, माती परीक्षण प्रयोगशाळा, जलसंधारण प्रयोगशाळा, पीक संरक्षण प्रयोगशाळा, सेंद्रिय शेती प्रयोग आणि बायोगॅस संयंत्र यांचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेत संवाद साधला. यावेळी संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी सांगितले की, देशातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या ध्येयाने आम्ही काम करत आहोत. हजारो



शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक तंत्रज्ञान व प्रशिक्षण दिल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. मात्र अजूनही अनेक अडचणी आहेत, शेतीसाठी आवश्यक रस्त्यांची कमतरता, प्रशासनाचे अपुरे सहकार्य आणि सरकारी योजनांच्या अंमलबजावणीतील अडथळे गंभीर आहेत. या पार्श्वभूमीवर अंजली दमानिया यांनी या कामात सहकार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.अनिश दमानिया, जे महाराष्ट्र शासनाच्या धोरणनिर्मिती संस्थेतील मित्राचे सचिव आहेत, यांनी सांगितले की,ग्लोबल विकास ट्रस्टमुळे हजारो शेतकऱ्यांचे जीवन बदलले आहे. अशा प्रकारचे काम करणाऱ्या संस्था अत्यंत कमी आहेत. या कार्याला अधिक बळकटी देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या जीवनात व्यापक परिवर्तन घडवण्यासाठी आम्ही कायम त्यांच्या सोबत राहू. तसेच शासनाच्या लोककल्याणकारी योजना अधिक प्रभावीपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी ट्रस्टसोबत समन्वयाने काम करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. या दौऱ्यादरम्यान बीड जिल्ह्याचे माजी जिल्हाधिकारी तथा माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनीही कृषीकुलची पाहणी करून उपक्रमांची माहिती घेतली आणि ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामाचे कौतुक केले. एकूणच, बीड जिल्ह्यातील बदलाची ही कहाणी केवळ प्रकल्पांची नाही, तर शाश्वत शेती, पाणी व्यवस्थापन आणि सामूहिक प्रयत्नांच्या बळावर उभ्या राहिलेल्या ग्रामीण पुनरुत्थानाची आहे-आणि त्यात कृषीकुलसारख्या उपक्रमांची भूमिका निर्णायक ठरत असल्याचे या भेटीतून अधोरेखित झाले.

**कायम ग्लोबल विकास ट्रस्टच्या सोबत राहू - अंजली दमानिया**

केवळ बिड जिल्यातील नव्हे तर राज्यातील आणि देशातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था काम करत आहे. जलनायक मयंक गांधी आणि संजय परमार यांच्या प्रयत्नातून संस्थेचा विस्तार झपाट्याने वाढत असल्याचा मला मनस्वी आनंद असून, आगामी काळात शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी रात्रंदिवस काम करणाऱ्या ग्लोबल विकास ट्रस्टसोबत सर्व पातळीवर काम करणार असल्याचेही सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बोलताना सांगितले.


# गायरान जमीन हस्तांतरण प्रक्रिया १५ मे पर्यंत पुर्ण करा-विभागीय आयुक्त जी.श्रीकांत

## विभागीय आयुक्तांकडून जिल्हानिहाय आढावा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**छ.संभाजीनगर । डॉ.ज्ञानदेव चेपटे**

छत्रपती संभाजीनगर- दि. २४-महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदींनुसार शासकीय जमिनीवरील ०१ जानेवारी २०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे नियमित करण्याबाबत २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयाच्या प्रभावी अंमल बजावणीसाठी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सर्व जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून आढावा घेतला. गायरान जमीन हस्तांतरण प्रक्रिया १५ मे २०२६ पर्यंत पुर्ण करा.तसेच याकामात कोणत्याही परिस्थितीत विलंब होणार नाही याची दक्षता घ्या, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज दिले.



विभागीय आयक्त कार्यालयात आयोजित बैठकीला अप्पर आयुक्त रिता मेत्रेवार, अप्पर आयुक्त सुषमा देसाई, सहायक आयुक्त शुभांगी आंधळे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त जी.श्रीकांत म्हणाले, आपल्या जिल्ह्यांतील गावनिहाय गायरान जमीनींवरील सन २०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे नियमानुसार नियमित करण्यासाठीची कार्यवाही गतीने होण्यासाठी सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांनी याबाबतचे अधिकारी उपविभागीय अधिकारी यांच्याकडेही द्यावेत. प्रधानमंत्री आवास योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांना घरकुलासाठी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी स्वराज्य संस्थांना १५ मे पर्यंत जमीन हस्तांतरीत करावी. सदरील १०० टक्के प्रक्रिया कोणत्याही परिस्थितीत १५ मे पर्यंत पुर्ण करावी. या कामकाजाचा विभागीय पातळीवरून दैनंदिन आढावा घेण्यात येईल. या कामाला विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

या बैठकीत शासन निर्णयाची अंमलबजावणी, प्रलंबित प्रस्तावांची स्थिती तसेच जिल्हानिहाय प्रगती यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शासकीय जमिनीवरील पात्र निवासी अतिक्रमणे नियमित करण्याची प्रक्रिया पारदर्शक, जलद आणि नियमानुसार पूर्ण करण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. नागरिकांना अनावश्यक त्रास होणार नाही याची दक्षता घेऊन सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करा. तहसीलदार तसेच गट विकास अधिकारी यांनी प्रक्रियेला गती देण्यासाठी शिबिरांचे आयोजन करावे तसेच प्राप्त प्रस्तावावर गतीने कार्यवाही करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

सर्वांसाठी घरे या संकल्पनेला गती देण्यासाठी पात्र लाभार्थ्यांना या प्रक्रियेचा जास्तीत जास्त लाभ मिळावा, यासाठी विशेष प्रयत्न करा. गृहनिर्माणाशी संबंधित योजना आणि अतिक्रमण नियमितीकरण प्रक्रिया यामध्ये समन्वय साधून नागरिकांना कायमस्वरूपी निवासाचा हक्क मिळवून देण्यावर भर देण्याची गरज आहे. यासाठी संबंधित यंत्रणांनी दैनंदिन कामकाजात या कामाला प्राधान्य द्यावे. मिशन मोडवर विहित कालमर्यादेत काम पुर्ण करा, असेही ते यावेळी म्हणाले.

जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या जिल्ह्यातील कामकाजाचा आढावा सादर केला. प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढून शासनाच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

बैठकीस महसूल, ग्रामविकास तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# माहूर मांडवीच्या जंगलात पाण्यासाठी 'वणवण'!


## धगधगत्या उन्हात वनराजही तहानेले;

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**किनवट:शेख शौकत**

पाणी शोधण्याच्या नादात महामार्गावर येणाऱ्या हरिण, काळविटांना सुसाट वाहनांचा बळी पडावे लागत आहे. पर्यावरणवाद्यांनी वनविभागाकडे काही ठोस मागण्या मांडल्या आहेत, जेणेकरून या मुक्या

पाण्याचा प्राण्यांचा जीव वाचवता येईल. नैसर्गिक स्त्रोतांमधील गाळ काढून ते तातडीने स्वच्छ करावेत, दुर्गम भागात असलेल्या कृत्रिम हौदांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, जिथे शक्य आहे तिथे सौर ऊर्जेवर चालणारे बोअरवेल बसवून कायमस्वरूपी प्रश्न मार्गी लावावा. वनविभागाने केवळ एसी केबिनमध्ये बसून नियोजन न करता प्रत्यक्ष जमिनीवर उतरून काम करण्याची गरज आहे. जर वेळीच पाणी उपलब्ध झाले नाही, तर आपण आपली वनसंपदा गमावून बसू. आता प्रशासन या आर्त हाकेला प्रतिसाद देऊन वन्यजीवांची तहान भागवण्यासाठी नेमकी



काय पावले उचलते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच सूर्याने आग ओकायला सुरुवात केली असून, याचा सर्वाधिक फटका माहूर मांडवीच्या समृद्ध वनसंपदेतील वन्यजीवांना बसू लागला आहे. नैसर्गिक पाण्याचे स्रोत आटल्याने बिबट्यापासून काळविटांपर्यंत साऱ्यांचीच पाण्यासाठी दाहीदिशा भटकंती सुरू असून, वनविभागाच्या 'कागदी' नियोजनावर आता वन्यप्रेमींनी कडक ताशेरे ओढले आहेत.

तालुक्यातील जंगल क्षेत्रात असलेले ओढे, नाले आणि झरे कोरडे पडले आहेत. जे काही मोजके नैसर्गिक पाणवठे उरले आहेत, त्यांत मोठ्या प्रमाणात गाळ आणि

कुजलेला पालापाचोळा साचला आहे. हे पाणी पिण्यायोग्य नसल्याने वन्यप्राण्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तातडीने या पाणवठ्यांची स्वच्छता न केल्यास वन्यजीवांना दूषित पाण्यामुळे जीव गमवावा लागण्याची भीती व्यक्त होत आहे. जंगलात पाणी मिळेनासे झाल्याने वन्यप्राणी आता आपला मोर्चा गावकुसाकडे वळवत आहेत. यामुळे

काही ठिकाणी मोठे धोके निर्माण झाले आहेत. पाण्यासाठी प्राणी शेतात किंवा वस्तीत शिरल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# पाचशे कर्मचाऱ्यांना तीन टप्प्यात जनगणना प्रशिक्षण

## हदगावचे तहसीलदार सय्यद उमर यांची माहिती

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । चंद्रकांत भोरे**

भारताची आगामी जनगणना २०२७ च्या अनुषंगाने हदगाव तालुक्यातील जनगणना कामासाठी नियुक्त पर्यवेक्षक व प्रगणकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा प्रशिक्षण कालावधी २३ एप्रिल २०२६ ते ६ मे २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला असून, हदगाव येथील वेंकटरमना हाय टेक इंग्लीश स्कूल येथे प्रशिक्षण पार पडत आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमात चार्ज अधिकारी तथा तहसीलदार सय्यद उमर यांनी मार्गदर्शन करत जनगणना प्रक्रियेचे महत्त्व, अचूक माहिती संकलनाची जबाबदारी तसेच कामकाजाची पद्धत याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी सर्व पर्यवेक्षक व प्रगणकांनी प्रामाणिकपणे आणि दक्षतेने काम पार पाडण्याचे आवाहन केले.

यावेळी नायब तहसीलदार अनिल तामसकर विजय महाजन मंडळ अधिकारी तथा फील्ड



ट्रेनर,आर. टी. राठोड ( फील्ड ट्रेनर), घाडके ( फील्ड ट्रेनर), अक्षय उडते ( फील्ड ट्रेनर), नागरगोजे ( फील्ड ट्रेनर), प्रतिक रामकिशन विश्वासराव ( फील्ड ट्रेनर), संदीप राठोड ( जनगणना महसुल सहाय्यक) विशाल लव्हांडे समन्वयक तथा टेक्निकल असिस्टंट, महेंद्र मुनेश्वर समन्वयक तथा टेक्निकल असिस्टंट तसेच तहसील कार्यालय हदगाव येथील कर्मचारी उपस्थित होते. जनगणनेसाठी नियुक्त पर्यवेक्षक व प्रगणकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

प्रशिक्षणा दरम्यान घर गणनेचे काम करण्याची प्रक्रिया याबाबतची माहिती नोंदविण्याच्या पद्धती, तांत्रिक बाबी तसेच प्रत्यक्ष कामातील अडचणींवर मार्गदर्शन करण्यात येत आहे. या प्रशिक्षणामुळे जनगणना २०२७ ची प्रक्रिया अधिक सुकर व अचूक होण्यास मदत होणार आहे.

# श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव सोहळा चिरनेर समितीच्या कार्यकारणीची निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उरण । विठ्ठल ममताबादे**

रायगड जिल्ह्यात श्री छत्रपती संभाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. रायगड जिल्ह्यात सर्वात मोठी श्री छत्रपती संभाजी महाराजांची जयंती उरण मध्ये छावा प्रतिष्ठान चिरनेर,युद्ध नौका ग्रुप व ग्रामस्थ मंडळ चिरनेर यांच्या माध्यमातून साजरी केली जाते. यंदा १४ मे २०२६ रोजी छत्रपती संभाजी महाराजांची ३६९ वी जयंती उरण तालुक्यातील चिरनेर येथे मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या उत्सवानिमित्त नुकतेच चिरनेर येथे संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत श्री छत्रपती संभाजी महाराज उत्सव समितीची कार्यकारिणीची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी सचिन केणी,कार्याध्यक्ष पदी योगेश गावंड,उपाध्यक्ष शैलेश चिर्लेकर ,सचिव ऋषिकेश कडू, सहसचिव मयुरेश सिंग, समन्वयक महेश केणी,सदस्य



पृथ्वीराज कडू, सदस्य जित तांडेल सदस्य आदित्य केणी यांची निवड झाली आहे. श्री छत्रपती संभाजी महाराजांचे विचार व कार्याचा प्रचार व प्रसार करणाऱ्या या श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव सोहळ्याच्या उत्सव समितीच्या विविध पदावर नियुक्ती झालेल्या सर्व पदाधिकारी सदस्यांवर शुभेच्छा व कौतुकांचा वर्षाव होत आहे. हे सर्व पदाधिकारी, सदस्य श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव सोहळा साजरी करण्यासाठी सज्ज झाले आहेत.

# उमरग्यात बेसबॉलचा जल्लोष; दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर संपन्न!

लोकनेता न्यूज नेटवर्क **। उमरगा । प्रतिनिधी**

ग्रामीण भागात बेसबॉल या खेळाला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद हायस्कूल, उमरगा येथे दिनांक २२ व २३ एप्रिल २०२६ रोजी आयोजित दोन दिवसीय भव्य प्रशिक्षण शिबिर उत्साहात आणि दिमाखात पार पडले. या शिबिराने उमरग्यातील क्रीडा क्षेत्रात नवचैतन्य निर्माण केले.या शिबिरात जिल्हा परिषद हायस्कूल, उमरगा सोबतच श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय, उमरगा व छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. तब्बल ७० हून अधिक खेळाडूंनी या प्रशिक्षणाचा लाभ घेत, मैदानावर आपली कौशल्ये सादर केली.शिबिरादरम्यान खेळाडूंना बेसबॉलच्या मूलभूत तंत्रांसह आधुनिक आणि तंत्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात आले. फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण यांसारख्या कौशल्यांमध्ये विद्यार्थ्यांनी विशेष प्रगती दर्शवली. राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी करण्यासाठी आवश्यक आत्मविश्वास आणि कौशल्य या शिबिरातून खेळाडूंमध्ये निर्माण झाले.या शिबिराचे मुख्य आकर्षण ठरले नांदेड येथील अनुभवी प्रशिक्षक बालाजी गाडेकर, ज्यांनी आपल्या प्रभावी आणि प्रेरणादायी मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना खेळाची सखोल माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे शिबिराला एक वेगळीच उंची प्राप्त झाली.

# बोरफळ जिल्हा परीषद शालेय समिती अध्यक्षपदी संभाजी मनोहर सुरवसे यांची निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जीवन जाधव । औसा**

औसा तालुक्यातील बोरफळ गावातील जिल्हा परीषद शाळेच्या शालेय समितीच्या अध्यक्ष पदी हुशार ,अनुभवी व समाजकार्यात सदैव तत्पर असलेल नेतृत्व मनुन ओळख असलेले संभाजी मनोहर सुरवसे यांची शालेय समिती अध्यक्ष पदी तर उपाध्यक्षपदी रामदास नागनाथ यादव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे ,यावेळी शालेय समिती नवनिर्वाचीत अध्यक्ष संभाजी सुरवसे यांनी बोरफळ जिल्हा परीषद शाळेतील गुणवत्ता वाढीसह विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे व शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षीततेसाठी आम्ही सदैव तत्पर राहु व येणार्या काळात शाळेची गुणवत्ता वाढीसह शाळेच्या विकासाला प्राधान्य देणार असल्याचे प्रसारमाध्यमांना सांगीतले ,यावेळी

या निवडीसाठी सरपंच बजरंग नाना जमादार, बोरफळ महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्ष संताजी




यादव, माजी उपसरपंच नागनाथ साळुंखे ,जिल्हा परीषद शाळेचे मुख्याध्यापक आरदवाड सर , शिक्षक रुक्मे सर , नीलकंठ यादव, बबन यादव , नागनाथ ढोले ,निशांत यादव, अनिल जमादार ,रमेश म्हेत्रे,दाजी बोराटे, सौदागर राऊत, वागू मांजरे, दत्ता मांजरे, पोपट यादव,खंडू बनकर , विष्णू सर्जे, महावीर बनसोडे,सह जिल्हा परीषद शाळेतील सर्व शिक्षक व बोरफळ गावातील सर्व पालक मंडळी व ग्रामस्थ उपस्थीत होते ,

# मांजरममध्ये बसवेश्वर जयंतीचा जल्लोष

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

समता नायक, जगत ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती मांजरम येथे मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. युवकांच्या पुढाकारातून काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीने संपूर्ण गाव दणाणून गेले.

बसवेश्वर नगर ते पालखी मार्गाने निघालेल्या मिरवणुकीत महात्मा बसवेश्वरांच्या कीर्तनमय गजरात वातावरण भारावून गेले होते. अनुभव मंडपाने केला जगाचा उद्धार, समतेचे ईश्वर दैवत महात्मा बसवेश्वर अशा गजरांसह युवकांनी सुमधुर गीतांवर ठेका धरत उत्साह ओसंडून वाहत होता.

मिरवणुकीदरम्यान शिवछत्रपती स्मारक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. गावातील विविध ठिकाणी



मिरवणुकीचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. या मिरवणुकीत युवकांचा उत्स्फूर्त सहभाग विशेष लक्षवेधी ठरला.

कार्यक्रमात माजी सरपंच प्रतिनिधी निळकंठराव माली पाटील, गणपतराव माली पाटील, पोलिस पाटील जयराज शिंदे, बिट जमादार शिंदे, माजी उपसरपंच बालाजी माली पाटील, पत्रकार विकास भुरे, राजेश कत्ते, सुभाष माली पाटील, गंगाधर शेनकुडे यांच्यासह युवा मंडळाचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेवटी महाआरती व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. मांजरममध्ये साजऱ्या झालेल्या या जयंती सोहळ्याने सामाजिक समतेचा संदेश देत एकात्मतेची भावना दृढ केली.

# हिमायतनगर सिरंजणी रोडवर भिषण अपघात

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । लक्ष्मण शेन्नेवाड**

शहरा लगत सिरंजणी रोडवर एका दुचाकी स्वाराला मालवाहतूक करणाऱ्या टेंम्पोनी उडवले त्यात एक जन जागीच ठार झाला तर दुसरा गंभीर जखमी आहे त्यास पोलिस प्रशासनाच्या वतीने लगेच रूग्ण वाहिकेत टाकुन दवाखान्यात हलविण्यात आले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,मौजे सिरपल्ली येथील रहिवासी गणेश सदाशिव जाधव व शंकर विठ्ठलराव वानखेडे हे काही कामा निमित्त हिमायतनगर येथे दुचाकी वाहनाने येत असताना ाह २६ह ७७७६ क्रमांकचा मालरहित टेम्पो भरधाव वेगाने येऊन दुचाकी स्वारांना भिषण धडक दिल्यामुळे त्यातील गणेश सदाशिव जाधव यांनी जागीच प्राण सोडला तर शंकर विठ्ठलराव शिंदे हे गंभीर



जखमी आहेत अपघाताची माहिती मिळताच पोलिस प्रशासनाच्या वतीने पोलिस कर्मचारी आरकिलवार व व्हि.एस.कलाले यांनी रूग्ण वाहिकेस फोन लावून त्यांना तात्काळ बोलावून घेऊन गंभीर जखमीस विलंब न लावता दवाखान्यात हलविले सदर घटने विषयी तालुक्यातुन हळहळ व्यक्त होत आहे.

# प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांना विधान परिषदेत संधी द्यावी कार्यकर्त्यांची जोरदार मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हाणेगाव । संतोष चिद्रावार लोणीकर**

महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे खंदे समर्थक शिवसेना गटाचे नेते ओबीसी विजेएनटी चे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किशवे यांना शिवसेना पक्षाकडून आगामी विधान परिषदेसाठी उमेदवारी देण्यात यावी अशी जोरदार मागणी त्यांच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

ही मागणी अहिल्यानगर येथील ओबीसी नेते शिवाजी त्र्यंबक गजभार यांनी केली आहे गजभार यांनी सांगितले की बाळासाहेब किशवे हे सामान्य कुटुंबातून आलेले लढवय्ये नेते असून त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाची सुरुवात तळागाळातूनच केली आहे त्यांनी समाजासाठी वेगवेगळ्या प्रकारचे आंदोलन केले व गरजु रुग्नांना शिबिराच्या माध्यमातुन आजारावर निदान मिळवुन दिले आहे समाजाच्या हक्कासाठी अहोरात्र झटणारे लढवय्ये समाजसेवक म्हणुन प्रचीत आहेत महाराष्ट्र कर्णाटक राज्यात त्यांचा दांडगा लोक संपर्क असुन त्याचा फायदा पक्षाला नक्कीच होईल त्यांनी शिवसेनेची विचारधारा गावागावात आणि खेड्यापाड्यात पोहोचवण्यासाठी सातत्याने मेहनत घेतली आहे किशवे यांनी शिवसेना ओबीसीच्या माध्यमातून गोरगरीब वंचित आणि मागासवर्गीय घटकांची मजबूत संघटना उभी केली आहे तसेच त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील विचारसरणी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्यकर्त्यांची दखल घेऊन शिवसेना नेतृत्वाने आगामी विधान परिषद निवडणुकीत त्यांना उमेदवारी देऊन ओबीसी व विजेएनटी यांची घटकातील कार्यकर्त्यांना न्याय मिळवून द्यावा अशी अपेक्षा गजभार व आनंद धुळगंडे,अनील धगनरे,अमोल गवते,ज्ञानेश्वर धुळगंडे,राम खरात,पवन धुळगंडे ,बालाजी थगनरे,मोहन थगनरे,हाणमंत डोरगळे,शंकर डेमाले,श्रीधर धुळगंडे आदी त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.



# शेतकरी नेते कैलास येसगे यांच्या पाठपुराव्याला यश

## अखेर खरीप २०२५ चा पिक विमा मंजूर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । वंकलवार प्रभू**

ऑगस्ट व सप्टेंबर मध्ये झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले होते. अतिवृष्टीनंतर तालुक्यातील शेतकऱ्यांना संघटित करून शेतकरी नेते तथा काँग्रेस पक्षाचे नांदेड जिल्हा प्रवक्ते कैलास येसगे कावळगावकर यांनी शासन व प्रशासनाकडे निवेदन देऊन शेतकऱ्यांना नुकसानभरपाई व हक्काचा पिक विमा मिळावा यासाठी पाठपुरावा केला. जास्तीत जास्त पिकविमा मिळावा यासाठी कृषी व महसूल प्रशासनाच्या सहकार्याने पीक कापणी प्रयोगही यशस्वीपणे केले. जिल्हा पातळीवर वारंवार पाठपुरावा करूनही विम्याबाबत



कुठलीच कार्यवाही झाली नाही; म्हणून कैलास येसगे यांनी मंत्रालय गाठून राज्याचे कृषी सचिव व राज्याचे कृषी आयुक्त यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या हक्काचा पिक विमा तात्काळ वितरित करण्याबाबत विमा कंपनीला आदेशान्वित करावे यासाठी पाठपुरावा करून तसे आदेश पत्र काढण्यास भाग पाडले. याचेच फलित म्हणून देगलूर तालुक्यासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील विमाधारक शेतकऱ्यांचा पिक विमा मंजूर झाला.देगलूर तालुक्यातील शेतकऱ्यांना चांगला पिक विमा परतावा मिळाल्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांनी सोशल मीडियाद्वारे शेतकरी संघर्ष योद्धा कैलास येसगे कावळगावकर यांचे अभिनंदन करून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे.

**नांदेड जिल्ह्यातील लढाऊ शेतकरी व शेतकरी चळवळीत साथीदार यांच्या भक्कम पाठबळामुळेच आम्ही पिकविम्याचा हा लढा सातत्याने लढू शकलोत. प्रथमतः नांदेड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांचे व शेतकरी चळवळीत नेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. नांदेड जिल्ह्याला सर्वाधिक ८१३ कोटी रुपये पिकविमा मंजूर झाला. तसेच देगलूर तालुक्यातील शेतकऱ्यांना सरासरी हेक्टरी ३० हजार रुपये पिकविमा मिळत आहे याचा मनस्वी आनंद होतो आहे. आपल्या सर्वांच्या सातत्यपूर्ण व संघटितपणे लढ्याचे हे यश आहे. योग्य वेळी पिक विमा मिळत असल्यामूळे शेतकरी आंनदात आहेत . येणाऱ्या खरिप हंगामची तयारी जोमाने होणार**

**–कैलास येसगे कावळगावकर**
**(संस्थापक– विश्व परिवार तथा जिल्हा प्रवक्ते– काँग्रेस पार्टी, नांदेड)**

# धनाजी जोशी यांना आर्ट ऑफ लिविंग चा पुरस्कार जाहीर एक मे रोजी छत्रपती संभाजी नगर येथे मान्यवरांच्या हस्ते होणार प्रधान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

आर्ट ऑफ लिविंग संस्थेच्या ४५ वर्षाच्या अविरत सेवायज्ञाच्या निमित्ताने तसेच गुरुदेव श्री श्री रविशंकर जी यांच्या प्रेरणादायी जीवनाच्या ७० व्या वर्षपूर्ती निमित्त मानवी मूल्य अध्यात्मक सामाजिक बांधिलकी आणि निस्वार्थ सेवेला प्रोत्साहन देणारा विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला असून या प्रेरणादायी पार्श्वभूमीवर आर्ट ऑफ लिविंग संस्थेमार्फत स्थापन करण्यात आलेल्या आणि गुरुदेव श्री श्री रविशंकरजी यांच्या आशीर्वादाने प्रदान केल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित art of living unsung everyday Heroes award देगलूर चे सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांना जाहीर करण्यात आला असून धनाजी जोशी यांच्या सामाजिक कार्याचा लेखाजोखा पूर्ण महाराष्ट्राच्या जनतेसमोर मांडण्यासाठी त्यांची नांदेड जिल्ह्यातून युवा गटांमध्ये निवड करण्यात आली असून निवडीचे पत्र छत्रपती संभाजीनगर विभागाकडून २२ एप्रिल रोजी पाठवण्यात आले असून दिनांक एक मे रोजी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स छत्रपती संभाजी नगर लोकल सेंटर रेल्वे



स्टेशन उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर येथे शुक्रवार एक मे रोजी सायंकाळी पाच वाजता धनाजी जोशी यांच्या प्रेरणादायी योगदानाचा गौरव करण्यात येणार आहे या पुरस्काराच्या निवडीबद्दल मानधना सर वदेगलूर आर्ट ऑफ लिविंग परिवाराच्या वतीने धनाजी जोशी यांना शुभेच्छा देण्यात आले.

# निवासी अतिक्रमणे नियमितीकरण करण्यासाठी नगरसेवकांचे हदगाव मुख्याधिकारी यांना निवेदन



लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । चंद्रकांत भोरे**

दि.२४/०४/२०२६ रोजी हदगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना भेटून, महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २५ मार्च २०२६ च्या महत्त्वपूर्ण निर्णयानुसार गायरान व शासकीय जमिनीवरील ०१/०१/२०११ पूर्वीच्या निवासी अतिक्रमणांचे नियमितीकरण करण्यासाठी तात्काळ प्रक्रिया सुरू करावी, याबाबत निवेदन देण्यात आले.या वेळी नवनिर्वाचित नगरसेवक लक्ष्मणराव गंगाधर काळबांडे, शिवा भैय्या चंदेल, फेरोज पटेल, मुजाहिद मिर्झा, व भिम काळबांडे यांनी एकत्र येत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर करून ही मागणी केली.या निर्णयामुळे आपल्या हदगाव शहरातील अनेक गरीब व गरजू कुटुंबांना त्यांच्या राहत्या जागेचा कायदेशीर हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.परंतु, सदर प्रक्रिया अद्याप सुरू नसल्यामुळे नागरिकांना योजनेचा लाभ मिळत नाही. त्यामुळे आज मुख्याधिकाऱ्यांकडे जाऊन अर्ज स्वीकृती प्रक्रिया तात्काळ सुरू करावी, नागरिकांना योग्य माहिती देण्यात यावी, प्रलंबित प्रश्न मार्गी लावावा अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

### नागरिकांना आवाहन

**हे काम फक्त नगरसेवकांचे नसून, आपल्या सर्वांच्या हक्काचे आहे. म्हणून सर्व नागरिकांनी: या योजनेबाबत जागरूक व्हावे आपल्या हक्कासाठी आवाज उठवावा.या कामात सक्रियसहकार्यकरावे.आपण सर्व एकत्र आलो तरच आपल्या हक्काचे घर आणि विकास मिळवू शकतो. आपला हक्क – आपली लढाई प्रत्येक कुटुंबाला सुरक्षित घर मिळणे हा त्यांचा हक्क आहे, आणि तो मिळवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. आपल्या सहकार्याची अपेक्षा – आपले नगरसेवक लक्ष्मणराव गंगाधरराव काळबांडे**

# फुले आंबेडकर जयंतीनिमित्त खेड बु.येथे वंध्यत्व निवारण व उपचार शिबिरात १७० पशुंवर उपचार

लोकनेता न्यूज नेटवर्क

महात्मा फुले जयंती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त दिनांक २१.०४.२०२६ रोजी खेड बु. येथे क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय शिरवळ व पशुसंवर्धन विभाग, खंडाळा यांच्या संयुक्त विद्यमाने वंध्यत्व निवारण व उपचार शिबिराचे महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विकास वासकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून व तदनंतर गोपूजन करून करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी डॉ. कविता खिल्लारे, चिकित्सालय अधीक्षक, डॉ. विश्वास साळुंके, विभागप्रमुख शल्यचिकित्सा विभाग, डॉ. महेश रांगणेकर, प्राध्यापक, प्रजननशास्त्र विभाग, डॉ. बालाजी आंबोरे, प्राध्यापक, चिकित्सालयीन औषधशास्त्र विभाग, डॉ. प्रशांत म्हसे, प्राध्यापक, सूक्ष्मजीवशास्त्र



विभाग, डॉ. प्रशांत पवार, प्राध्यापक पराजीविशास्त्र विभाग, डॉ. विठ्ठल धायगुडे, प्राध्यापक, विकृतीशास्त्र विभाग, डॉ. रविंद्र जाधव, सहाय्यक प्राध्यापक, चिकित्सालयीन औषधशास्त्र विभाग, डॉ. भोसले, सहय्यक आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, डॉ. दर्शन काकडे, पशुधन विकास अधिकारी व श्री. गणेश धायगुडे, पदव्यत्तर तसेच अंतिम वर्षाचे विद्यार्थी व गावातील पशुपालक उपस्थित होते. या शिबिरात एकूण २३ गायी–म्हशींमध्ये वंध्यत्व तपासणी व उपचार करण्यात आले, तसेच २० जनावरांना विविध औषधोपचार तर २ जनावरांमध्ये लहान शस्त्रक्रिया करण्यात आली. तसेच एकूण १०० शेळ्या–मेंढ्यांमध्ये पी.पी.आर. आजाराप्रती लसीकरण करण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. कविता खिल्लारे, चिकित्सालय अधीक्षक तसेच सहभागी प्राध्यापक, अंतिम वर्षाचे विद्यार्थी व पदव्युत्तर विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# कंधार आगारातून नवीन कंधार ते माहूर उनकेश्वर, पांढरकवढा मार्गे चंद्रपूर बसचा शुभारंभ

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मांडवी । प्रतिनिधी**

दि.२३ एप्रिल पासून प्रवाशांच्या आग्रहातर व प्रवासी सेवेसाठी कंधार आगारातुन कंधार चंद्रपूर बसेस वेळ सकाळी ९.१५ वा.चा अगदी उत्साहात शुभारंभ करण्यात आला हा मार्ग कंधार नांदेड उमरखेड माहुर पांढरकवडा मारेगाव वणी घुग्गुस चंद्रपूर मार्ग धावणार आहे सदर बसचे आजचे चालक श्री एम आर नराटे व वाहक श्री पि एम पवार यांचा जंगी सत्कार करून बस ला हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ करताना यावेळी वाहतुक निरीक्षक श्री जगदीश मंटगे साहेब, सहाय्यक वाहतूक निरीक्षक श्री राजुभाऊ कदम , वाहन परिक्षक श्री एम टी घुगे,वाहतुक नियंत्रक श्री मोहन अप्पा शेकापुरे, श्री दत्ताभाऊ कंधारे, श्री राजीव केंद्रे, श्री एफ एम शेख, श्री बि के गुंडाळे, श्री मारोती श्रीमंगले, श्री ए आर जाधव , बालाजी तेलंगे इत्यादी कर्मचारी चालक वाहक उपस्थित होते,

हि बस उनकेश्वर हून दुपारी ४ वा. चंद्रपूर ला जाते
सकाळी ५:४५ वा.चंद्रपूर वरून कंधार सुटते व उनकेश्वर वरून सकाळी ९. वा. कंधार साठी मार्गस्त होते.
किनवट ते मांडवी, उनकेश्वर, पायपांगरा,घाटंजी, वडगांव पोस्टे मार्गे यवतमाळ ही बस
किनवट वरुन सकाळी ७ वा. सुटते
व यवतमाळ वरून सकाळी ११:३० वा. किनवट साठी सुटते
या फेर्याचा सर्वे प्रवाशांनी लाभ घ्यावा.






**सर्वे गोर गरीब जनतेनी या महामंडळ एसटीप्रवासाचा लाभ घ्यावा असे अहवान मा.श्री प्रशांत भाऊ राठोड यांनी केला आहे.**

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933